प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा
आदेश क्रमांक : 308 सन २०२५, दिनांक : ०४/०९/२०२५

पहा:- ०१) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनिय पत्र बी (जन) ५६०१/५७/२०२४/१८०२, दिनांक ०३.१०.२०२४.
०२) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक : ३०५/२०२५, दिनांक ०३.०९.२०२५.
०३) दिनांक ०४.०९.२०२५ रोजीची कार्यालयीन टिपणी व त्यावरी पारीत आदेश.

उपरोक्त मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे संदर्भ क्र. ०१ मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या अटी व शर्ती अन्वये या जिल्हयाचे न्यायीक आस्थापनेवर लघुलेखक (ग्रेड-३) या पदाची निवड / प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सिंदखेड राजा यांचे आस्थापनेवर लघुलेखक ग्रेड-३ या रिक्त असलेल्या पदाच्या अनुषंगाने तसेच संदर्भ क्रमांक ०३ वरील पारीत आदेशान्वये नियुक्तीबाबतचा आदेश खालील प्रमाणे पारीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	कर्मचा-याचे नाव व पदनाम	नवीन नियुक्ती व स्थळ
०१	श्री. रवि सुभाष सदार लघुलेखक (ग्रेड-३) या पदाची निवड यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक १४ वरील उमेदवार.	दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सिंदखेड राजा यांचे आस्थापनेवर श्री. एस.डी.परिहार यांचे राजीनाम्याने रिक्त झालेल्या पदी तदर्थ तत्वावर (ad-hoc basis) लघुलेखक ग्रेड-३ म्हणुन नविन नियुक्ती.

सदर्हु आदेश हा नवनियुक्त कर्मचाऱ्यासाठी दिनांक ०८.०९.२०२५ रोजीचे मध्यान्हापुर्वपासुन अंमलात येईल.

लघुलेखक ग्रेड-३ या पदाच्या निवड यादीवरील नवनियुक्त उमेदवार अनुक्रमांक १४ यांना सुचित करण्यात येते की, त्यांची नियुक्ती ही मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तदर्थ तत्वात्वर (ad-hoc basis) करण्यात येत आहे. तसेच त्यांना पुढे असेही सुचित करण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तुम्ही कार्यालयात हजर झाल्याच्या दिनांकापासुन, पुढील एक वर्षाच्या आत (within one year), आपणास निर्गमीत करण्यात आलेल्या नियुक्ती आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सदर परिक्षा एक वर्षाचे आत (within one year) उत्तीर्ण न झाल्यास आपणास सेवेतुन

कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी तसेच त्याबाबतचे आपले हमीपत्र आपण रुजु झाल्यानंतर त्या कार्यालयात सादर करावे.

तसेच लघुलेखक ग्रेड-३ या पदाच्या निवड यादीवरील वर नमुद नवनियुक्त उमेदवार यांना पुढे असेही सुचित करण्यात येते की, त्यांची या आदेशाद्वारे करण्यात आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता शासनाचे सेवेतून कमी करण्यात येईल. तसेच त्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालय, मुंबई व जिल्हा न्यायालयाच्या भविष्यात होणाऱ्या आदेशाला अधिन राहुन करण्यात आलेली आहे याची त्यांनी नोंद घ्यावी.

त्यांना पुढे असेही सुचित करण्यात येते की, त्यांनी **दिनांक ०८.०९.२०२५** रोजीचे मध्यान्हापुर्वला किंवा त्यांना हा नियुक्तीचा आदेश मिळाल्यापासुन ०७ दिवसाचे आंत त्यांनी त्यांचे लघुलेखक ग्रेड-३ या पदी रुजु व्हावे. तसे करण्यास चुकल्यास त्यांचे नाव निवड यादीवरुन काढून टाकण्यात येईल व त्यांचा नियुक्तीचा आदेश हा रद्द करण्यात येईल.

उपरोक्त सन २०२३ चे लघुलेखक ग्रेड-३ पदाची निवड यादीतील उमेदवाराची वेतननिश्चिती एस-१४, वेतन बॅण्ड ३८६००-१२२८००/- या सुधारीत संरचनेत रुपये ३८६००/- या मुळ वेतनावर निश्चित करण्यात येत आहे.

उपरोक्त उमेदवारांनी कामावर रुजु झाल्यानंतर त्यांचे तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणुकीचे बंधपत्र, एकनिष्ठतेचे शपथपत्र, वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि नियमानुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्वरीत नेमणुकीच्या ठिकाणी सादर करावी. तसेच त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा स्वत:हून दयावयाचा झाल्यास ०१ महिना अगोदर तशी नोटीस अथवा त्या ऐवजी ०१ महिन्याचे वेतन त्यांना भरुन दयावे लागेल.

संबंधित पिठासीन अधिकारी यांना असेही सुचित करण्यात येते की, नवनियुक्त उमेदवार हे त्यांच्या आस्थापनेवर रुजू होताक्षणीच त्यांचे कडून आवश्यक ते प्रतिज्ञापन घेवून व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८.०८.२०१७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना दोन प्रतीत घेण्यात येवून पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा न्यायालयास पाठवावे.

उमेदवारांनी चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबतचे साक्षांकन नमुन्यामध्ये सादर केलेली माहिती असत्य आल्याचे आढळुन आल्यास निर्गमित करण्यात आलेले तात्पुरते नियुक्तीपत्र हे

रद्दबातल करुन भारतीय न्याय संहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल व निवड यादीवरुन नाव कमी करण्यात येईल.

RNcade
04/09/2025
(आर.एन.रोकडे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

पृष्ठांकन क्रमांक /आस्था./४९३३/२०२५, दिनांक : ०४/०९/२०२५
प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

०१. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, सिंदखेड राजा.

०२. श्री. रवि सुभाष सदार, राहणार मु.पो. खडकी सदार, ता. रिसोड, जिल्हा वाशिम ४४४ ५०६ (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)

०३. अधिक्षक (कार्यव्यवस्थापन / तांत्रिक विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०४. सहायक अधिक्षक (आस्थापना / वित्त व लेखा विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०५. वरिष्ठ लिपीक (वेतन देयक / कार्यव्यवस्थापन विभाग / प्रवास भत्ता), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

०६. अध्यक्ष / सचिव, जिल्हा न्यायालयीन कर्मचारी पत संस्था, खामगांव.

०७. सहायक, संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचा आदेश संबंधीत न्यायालयीन आस्थापनेच्या ई-मेल वर अपलोड करावा.

०८. कार्यालय प्रत.